| MHSN110008912022 | नियमित दिवाणी दावा क्र.२२३/२०२२<br>अशोक घाडगे / नंदकुमार घाडगे |
|---|---|

## निशाणी १७ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी प्रतिवादी क्र.१ विरुध्द तुर्तातुर्त ताकीदीसाठी दाखल केला आहे.

२. या वादाची पार्श्वभूमी अशी आहे की, वादी यांनी वाटपासाठी दावा दाखल केलेला आहे. वादी यांच्या मते, मूळ पुरुष कृष्णा यांना ताराबाई आणि शुक्राबाई अशा दोन पत्नी होत्या. ताराबाईच्या पश्चात शुक्राबाई यांच्याशी कृष्णा यांचा विवाह झाला होता आणि त्यांना वादी व प्रतिवादी क्र.४ व ५ असे वारस आहेत. मात्र, प्रतिवादी क्र.१ याने त्या सर्वांना डावलून त्यांचे नाव दावा मिळकतीला लावून घेतलेले आहे. सबब, वादी यांनी वाटपाची मागणी केलेली आहे.

३. याकामी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या विरुध्द दावा एकतर्फा चालविण्याचे आदेश झाले होते. मात्र, प्रतिवादी क्र.१ ते ३ हे या दाव्यात हजर झालेले आहेत. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी दाव्याला आपली कैफियत सादर केलेली आहे. मात्र, प्रतिवादी क्र.१ याने दाव्यात कैफियत सादर केलेली नाही.

४. अशा परिस्थितीमध्ये प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी सादर करुन थोडक्यात असे कथन केलेले आहे की, दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी क्र.४ व ५ यांचा कोणताही संबंध नाही. प्रतिवादी क्र.१ याने सदर प्रतिवादी क्र.४ व

५ आणि वादी यांना पुढे करुन दावा आणलेला आहे. वस्तुतः दावा मिळकती या प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या वाडवडिलार्जित मिळकती आहेत. त्यापैकी गट नं.३१०/१ मध्ये प्रतिवादी क्र.३ याला २ आर क्षेत्रात घर बांधण्यासाठी प्रतिवादी क्र.१ व २ यांनी कार्यकारी दंडाधिकारी यांचेसमोर प्रतिज्ञापत्र करुन संमती दिलेली आहे. त्यानुसार शासन दफ्तरी पत्रव्यवहार करुन प्रतिवादी क्र.३ याला अनुदान देखील प्राप्त झाले आहे. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या दरम्यान सरसनिरस मानाने वाटप होण्याकरीता वाटप स्मरणपत्राचा नोटराईज्ड लेख दिनांक २९/१२/२०२१ रोजी करण्यात आलेला आहे आणि त्याप्रमाणे दावा मिळकती या सदर प्रतिवादींच्या कब्जात आहेत. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी क्र.१ याने त्याच्या कौटुंबिक अडचणीकरीता त्याच्या हिश्याची गट नं.३१०/२ मधील ० हे ४०.३३ आर क्षेत्र बबन नसले यांना विक्री दिला असल्याने त्या गटात प्रतिवादी क्र.१ याचा आता कोणताही संबंध नाही.

५. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी क्र.३ याला घरकूल मंजूर झाले असून वाटणीप्रमाणे ताब्यात असलेल्या जागेमध्ये त्याने बांधकाम करायला सुरु केले असता प्रतिवादी क्र.१ याने त्याला शिवीगाळ करुन बांधकाम करण्यापासून मज्जाव केला. त्याबाबत दिनांक २०/०९/२०२२ रोजी अदखलपात्र स्वरुपाचा गुन्हा देखील नोंद देखील केला आहे. प्रतिवादी क्र.१ याला बरेच समजावून देखील तो ऐकत नाही. सबब, प्रतिवादी क्र.१ हा बेकायदेशीर कृत्यांच्या आधारे प्रतिवादी क्र.२ व ३ यांना हरकत अडथळा करत असून प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी प्रतिवादी क्र.१ विरुध्द तुर्तातुर्त ताकीद मागून प्रतिवादी क्र.१ याने दावा मिळकतीमधील प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये किंवा हुसकावून लावू नये किंवा प्रतिवादी क्र.३ याने चालू केलेल्या घरकूल बांधकामाला अडथळा करु नये अशी ताकीद मागितलेली आहे.

६. या अर्जावरती प्रतिवादी क्र.१ याच्या कडून म्हणणे मागविण्यात आले.

मात्र, त्याने कोणतेही म्हणणे दिलेले नाही. तसेच वादी याचे देखील म्हणणे मागविण्यात आले. मात्र, वादीने देखील या अर्जाला कोणतेही म्हणणे दिलेले नाही. वादीमार्फत दाव्याचे इतर कोणतेही कामकाज पुढे चालविण्यात आलेले नाही.

७. मी प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्या विधिज्ञामार्फत केलेला युक्तिवाद ऐकला. दाव्यासोबत सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. एकंदरीत परिस्थितीमध्ये माझ्यासमोर खालील मुद्दे उपस्थित राहतात.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी प्रथमदर्शनी बाजू सादर केली आहे काय ? | होकारार्थी... |
| २. | न्यायाचा समतोल हा मनाई देण्याच्या बाजूने झुकलेला आहे काय ? | होकारार्थी... |
| ३. | मनाई नाकारल्यास प्रतिवादी क्र.२ व ३ यांचे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | होकारार्थी... |
| ४. | काय आदेश ? | अर्ज मंजूर... |

## कारणमिमांसा

## मुद्दा क्र.१ ते ३ बाबत

८. या कामी दाव्याचे अवलोकन केले असता वादीने दाव्यासोबत केवळ दोन ७/१२ उतारे दाखल केले आहेत. त्यामुळे वादी म्हणतात त्याप्रमाणे त्यांच्या बाजूला दुजोरा देणारे असे कोणतेही तथ्य दिसून येत नाही.

९. याकामी प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचे

अवलोकन केले असता असे दिसून येते की, दावा मिळकतीला सदर प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचे नाव लागल्याबाबत फेरफार हजर करण्यात आलेले आहे. याकामी प्रतिवादी क्र.१ याने बबन नाना नसले यांच्या नावे केलेल्या खरेदीपत्राचे अवलोकन केले असता त्यामध्ये प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी सदर व्यवहाराला संमती दिल्याचे सादर केलेल्या खरेदीपत्रामधून दिसून येते. त्याचप्रमाणे त्या मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्या मिळकतीच्या चतुःसीमा नमूद केल्याचे देखील दिसून येते. या गोष्टीवरुन प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी मांडलेल्या बाजूनुसार त्यांच्यामध्ये वाटप झालेले आहे या गोष्टीला दुजोरा मिळतो. मात्र, वाटपासाठी त्यांनी नोटराईज्ड संमतीपत्रावर आपली भिस्त ठेवलेली आहे. परंतु नोटराईज्ड वाटप स्मरणपत्राचे अवलोकन केले असता ते वाटपपत्राप्रमाणे आहे आणि मूळात वाटपपत्र हे नोंदणीकृत असल्याखेरीज त्याचा उपयोग करता येणार नाही.

१०. असे जरी असले तरी प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये एक संमतीपत्र दिसून येत असून त्याचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी कार्यकारी दंडाधिकारी यांचेसमोर एक प्रतिज्ञापत्र केल्याचे दिसून येते. त्यामध्ये प्रतिवादी क्र.३ याने दावा मिळकतीपैकी गट नं.३१०/१ मध्ये २ गुंठे घरकामासाठी दिल्या बाबतचा मजकूर नमूद करण्यात आलेला आहे. थोडक्यात, प्रतिवादी क्र.३ याच्या घरकुलाला प्रतिवादी क्र.१ व २ यांनी संमती दिलेली आहे. यामुळे प्रतिवादी क्र.१ याला इक्विटीच्या तत्वाचा विचार केला असता प्रतिवादी क्र.३ विरुध्द हरकत घेता येणार नाही.

११. याबाबत प्रतिवादी क्र.३ याने प्रतिवादी क्र.१ विरुध्द दाखल केलेल्या अदखलपात्र स्वरुपाच्या तक्रारीवरुन असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.१ याने प्रतिवादी क्र.३ याच्या घराच्या बांधकामावरुन तसेच शेतमिळकतीच्या वादावरुन शिवीगाळ केलेली आहे. या सर्व गोष्टीवरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.१ हा त्याने दिलेल्या संमतीच्या विरुध्द वागत आहे. तसेच गट नं.३१०/२ मधील

क्षेत्र विकून देखील तो प्रतिवादी क्र.३ याला हरकत अडथळा करत आहे. प्रस्तुतचा दावा वाटपाचा असल्यामुळे सर्वच पक्षकार वादी आहेत. त्यामुळे मिळकतीच्या हक्क अधिकाराबाबत प्रस्तुत प्रकारचा अर्ज दाखल करता येवू शकतो. सबब, एकंदरीत परिस्थितीमध्ये प्रतिवादी क्र.३ यांनी प्रथमदर्शनी बाजू दाखविलेली असून न्यायाचा समतोल हा मनाई देण्याच्या बाजूने झुकलेला आहे. प्रतिवादी क्र.२ व ३ च्या लाभात तुर्तातुर्त ताकीद न दिल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. परंतु जागा सामाईकात असल्याने मनाई देताना सदर गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी देवून मुद्दा क्र.४ बाबत खालील आदेश पारीत करतो.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ याने प्रतिवादी क्र.३ याने चालू केलेल्या घरकुल बांधकामास हरकत अडथळा करु नये, प्रतिवादी क्र.१ याने दावा मिळकत गट नं.३१०/२ मधील प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये, दावा मिळकतीमधून प्रतिवादी क्र.२ व ३ यांना हुसकावून लावण्याचे कोणतेही कृत्य प्रतिवादी क्र.१ याने करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद देण्यात येते.

VINAYAK DATTATRAY PATIL

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2023.05.16 15:58:54 +0530

आटपाडी.
दिनांक : १५/०५/२०२३

(वि. द. पाटील)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
आटपाडी

*****

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mr. Ketan Ashok Sargar, (Grade-III) |
| Court | : | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Atpadi |
| Date | : | 15/05/2023 |
| Order signed by the Presiding Officer | : | 15/05/2023 |
| Order uploaded on | : | 16/05/2023 |